# मराठवाड्याचा आर्थिक विकास : एक प्राथमिक अभ्यास

गायकवाड प्रेमचंद गुंडू
संशोधक , इतिहास विभाग , सवित्रीबाई फुले, पुणे विद्यापिठ,पुणे .



## मराठवाड्याची ऐतिहासिक पाश्वभुमी :

मराठवाडा म्हणजे विद्यमान महाराष्ट्र राज्यातील एक प्रादेशिक विभाग आहे. या विभागाच्या भौगोलिक सीमा निश्चित नसुन निरनिराळ्या कालखंडात त्या बदलत गेल्या आहेत. तसेच यातील उपविभागची नावेही बदलत गेली आहेत. पुर्वी मराठवाडयाचे पाच जिल्हे होते. १९८२ पासून जालना व लातुर या जिल्ह्याचा समावेश झाला. सद्य: हिंगोलीचा समावेश झाल्याने या विभागात एकुण आठ जिल्हे आहेत. वरील कारणास्तव या विभागाचे क्षेत्रफळ व लोकसंख्या वेळोवेळी बदलत गेली आहे.

महाराष्ट्र राज्य व इतर प्रादेशिक विभाग याच्या तुलनेत मराठवाड्याची २०११ च्या जनगणने नुसार लोकसंख्या खालील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

### तक्ता क्र. १ राज्याचे व प्रदेशांचे क्षेत्रफळ आणि लोकसंख्या मुंबई वगळुन

| प्रदेश | क्षेत्रफळ ०० हेक्टर्स | टक्केवारी | लोकसंख्या ( २०११ ) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| उर्वरित महाराष्ट्र | १४४८९३ | ४७.४ | ५८१८७५३७ | ५८.२ |
| मराठवाडा | ६४८१३ | २१.० | १८७३१८७२ | १८.२ |
| विदर्भ | ९४४०४ | ३१.७ | २३०१२५५९ | २३.० |
| महाराष्ट्र राज्य | ३०७११० | १०० | ९९९३१९६० | १०० |

### मराठवाड्याच्या लोकसंख्येचे जिल्हा निहाय लोकसंख्या (२०११)

| अ.क्र. | जिल्हा | एकुण कुटूंबे | एकुण लोकसंख्या हजारात | | | कुटूंबाचा सरासरी आवार | नगरी लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरूष | स्त्रिया | एकुण | | |
| १ | औरंगाबाद | ७५२ | १९२४ | १७७७ | ३७०१ | ४.९ | ४३.८ |
| २ | जालना | ३९२ | १०११ | ९४८ | १९५९ | ५.० | १९.३ |
| ३ | परभणी | ३६१ | ९४३ | ८९३ | १८३६ | ५.१ | ३१.० |
| ४ | हिंगोली | २९९ | ६०६ | ५७१ | ११७७ | ५.१ | १५२ |
| ५ | बीड | ५३६ | १३३९ | १२३६ | २५८५ | ४.८ | १९.९ |
| ६ | नांदेड | ६६५ | १७३० | १६३१ | ३३६१ | ५.१ | २७.२ |
| ७ | उस्मानाबाद | ३५१ | ८३२ | ९७६ | १६५८ | ४.७ | १७.० |
| ८ | लातूर | ४८२ | १२७३ | ११८१ | २४५४ | ५.१ | २५.५ |
| ९ | महाराष्ट्र राज्य | २४४२२ | ५८२४३ | ५४१३१ | ११२३७४ | ४.६ | ४५.२ |

ऋग्वेदातील दक्षिणपथात, महाभारतातील दंडकारण्यात आणि रामायण व मत्सपुराणातील दक्षिणापथात मराठवाड्याचा प्रदेश सामावलेला होता. महाभारत काळापासून मराठवाड्याचा निरनिराळ्या भागास निरनिराळी नावे होती असे दिसते. उस्मानाबाद जिल्ह्याचा काही भाग कुंतल देशात तर औरंगादच्या काही भाग मुलकात आणि नांदेड व बीड जिल्ह्याचा काही भाग अश्मकात प्राचिन काळी सामावलेला होता.

ऐतिहासिकदृष्ट्या मराठवाडा हे नाव फारसे जूने नाही. १८६४ च्या कागदपत्रात या प्रशाला मराठवाडी असे संबोधल्याचे आढळते पुढे मराठवाडीचेच मराठवाडा झाले. मराठी भाषिक बहुसंख्य असलेल्या निजामाच्या संस्थानातील प्रदेशाला हे नाव दिले गेले होते.

**भागोलिक रचना :**

मराठवाड्याच्या उत्तरेस महाराष्ट्र राज्याचे जळगाव व बुलढाणा हे दोन जिल्हे आणि पश्चिमेला नासिक व अहमदनगर जिल्हे येतात. दक्षिणेकडे सोलापुर आणि कनार्टक राज्यातील गुलबर्गा व बीदर हे जिल्हे आहेत. पुर्वेला आंध्रप्रदेश राज्यातील कामारेड्डी, निजामबाद व आदीलाबाद तसेच महाराष्ट्रातील यवतमाळ व आकोला हे जिल्हे आहेत.

**आकृती १.व २ महाराष्ट्र राज्याचा नकाशात मराठवाडा याप्रदेशाचे स्थान**
**तसेच मराठवाड्यातील ८ जिल्ह्यावंर एक दृष्टीक्षेप**






मराठवाडयाचा प्रदेश मुख्यत : काळया बेसाल्ट खडकाचा बनलेला आहे. मराठवाड्याचे पठार समुद्रसपाटीपासुन सरासरी ३८१ मीटर उंचीवर आहे. प्राकृतिकदृष्ट्या मराठवाड्याचे दोन भाग पडतात. १ ईशान्य आणि पुर्वेकडील पठार २. नैऋत्य व दक्षिण भागातील सखल प्रदेश, पर्वतांची तिसरी

रसंग, औरंगाबाद आणि बीड जिल्ह्यांची विभागणी पठारव सखल प्रदेशात करते. बालाघाट, जालना डोंगर व अजिंठ्याचा डोंगर याप्रदेशातील प्रसिध्द डोंगर होत.

या प्रदेशातील गोदावरी पुर्णा व मांजरा या प्रमुख नद्या आहेत. उस्मानाबाद वगळता गोदावरी या प्रदेशाच्या चार जिल्ह्यातुन वाहते. गोदावरी खोऱ्यातील गाळाची जमिन अनेक मीटर खोल आहे या नैसर्गिक सुपिकतेमुळेच मानव अश्मयुगापासुन या भागत आकृष्ट झाला आहे. पैठण येथे जायकवाडी हा मोठा प्रकल्प बांधण्यात आला आहे. या शिवाय या प्रदेशात अनेक नद्या उपपद्या आहेत. हवामान किंचीत उष्ण व कोरडे असून पाऊस सरासरी ८० से.मी. पडतो. परंतू अलिकडे काही वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने हा प्रदेश अवर्षण प्रवण म्हणुन ओळखला जातो.

मराठवाड्यातील पैठण, भोकरन, देवगिरी, तेर यासारखी ठिकाणे व्यापारी मार्गावरील केंद्रे होती. पैठण व तेर हि ठिकाणे एका मार्गाने भडोचला जोडलेली होती. दुसरा मार्ग चाळीसगांव , वेरूळ औरंगाबाद मार्गे सोपा या पर्यंत तर प्रतिष्टानला उज्जैनशी जोडणारा मार्ग अजिंठा बहाळ आणि करहाणपुरद्वारे जात होता. व्यापार उदिमांचे संबंधात मराठवाडा फारसा गतिशिल होता असे म्हणता येणार नाही. तेर, देवगिरी, पैठण भोकददन ही काय ती या बाबतीत महत्वाची व्यापार केंद्रे होती.

पुरातत्व विद्वांनांच्या मतानुसार मराठवाड्यात मानवी वस्ती ७०००० वर्षापासुन आहे. १८६५ मध्ये वायने या संशोधकाला पैठणजवळ मुंगी येथे मध्यपुराश्मयुगीन दगडी हत्यारे मिळाली. महाराष्ट्रात मिळालेली हि पहिली अश्मयुगीन हत्यारे होत. मानवाने स्थिर जिवनास प्रारंभ केला तेव्हापासुन मराठवाड्यात त्यांचे अस्तित्व आढळते. इतकेच नव्हे तर महाराष्ट्रातील आद्य शेतकरी यांची वस्ती ज्ञानेश्वरांच्या जन्मगांवी आपेगाव तसेच पुरातत्वाज्ञांना आढळून आली. उत्खननात तेथे ताम्रपाषायुगीन घरांचे अवशेष, रंगीत खापरे, धान्ये दगडी हत्यारे मिळाली. या वस्तीचा काळ इ.सन पुर्व १५६४ असा कार्बन १४ पध्दतीने ठरविण्यात आला आहे. पुराणातील वर्णनानुसार मराठवाड्याचा काही भाग नंदाच्या साम्राज्यात असावा असे दिसते. नव नंदडेरा म्हणजे नांदेड असेही मानले जाते. ज्ञानकोपकारांच्या मते पैठण ही त्यांची दक्षिणेकडील राजधनी होती. पुढे अशोकाच्या लेखातुन पेतनिकाचा म्हणजेच पैठणचा उल्लेख आढळतो.

### भरभराटीचा काळ :

मराठवाड्याला महत्व आले ते सातवाहन वंशाच्या कारकिर्दीत. दक्षिणेकडील पहिल्या व मोठ्या साम्राज्याची राजधानीच पैठण येथे होती. या राजकुलाने तर मराठवाड्याला राजकिय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात स्थान मिळवून दिले. तसेच कला क्षेत्रात मोलाची कामगीरी करण्यास प्रवृत्त केले. पैठण, तेर, भोकरदन हि गावे याच काळात भरभराटीस आली. अजिंठा येथील पहिल्या गटातील व पितळखोरे येथील लेणी याच काळातील होत. यानंतर चालुक्य, वकाटक या राजघराण्यांचा संबंध मराठवाड्याशी आला. मराठवाड्याला यादवांच्या काळात फार महत्व आले. देवगिरी हि त्यांची राजधानी होती. यादव काळात मराठवाड्याची सर्व क्षेत्रात विशेषतः संगीत, कला, वाङःमय इत्यादीत प्रगती झाली. रामचंद्र १२७१ ते १३२१ हा यादवांचा शेवटचा रा मराठवाडा यांच्या काळात परमोत्कर्षाला पोहचला आहे.

### संताचे महत्व :

मराठवाडा संतभुमी म्हणुन प्रसिध्द आहे. ज्ञानेश्वरादी भांवडे, नामदेव, विसोबा खेचर, गोरा कुंभार, जनाबाई, जगमित्र नागा, सेना न्हावी, जनार्दन स्वामी भानुदास, एकनाथ, समर्थ रामदास हि सर्व संताची मांदीयाळी मराठवाड्याच्या भुमित जन्मलेली. आर्वाचीन काळात ही परंपरा नाथसांप्रदायी गुंडा महाराज, समर्थ सांप्रदायी श्रीधर स्वामी येथपर्यंत जाते. याशिवाय गातार्णवकार दासोपंत, आदी कवी मुंकुदराज, शिवकल्याण, भास्करभट्ट बोरीकर, कृष्णदास, जनी जनार्दन,गोपळनाथ, मध्वमुनी अमृतराव, उध्दव चितध्घन, वामन पंडीत ही सर्व कवी मंडळी मराठवाड्याची होय. मराठवाड्यात जगप्रसिध्द अजिंठा वेरूळ लेणी, महाराष्ट्रातील ५ जोर्तीर्लीगापैकी ३ तर देवीच्या साडेतीन शक्तीपीठापैकी २ मराठवाड्यात आहेत. याशिवाय हेमांडपंथी म्हणून प्रसिध्द असलेली १०० मंदीरे मराठवाड्यात आहेत.

### विषय प्रवेश :

प्रस्तूत शोध निबंधात मराठवाडयाच्या आठ जिल्ह्यांची लोकसंख्या व क्षेत्रफळ यात वेळोवळी झालेल्या बदलांच्या अनंषंगाने संबंधित विषयाची निगडीत अभ्यासाचे सादरी करण येथे केले आहे. प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम सामग्रीवर आधारीत असुन हयासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, शासनाची प्रकाशने, अहवाल, सर्वेक्षण अहवाल,जनगणना अहवाल इ. च्या आधारे माहिती संकलित केलेली असून अशा सर्व ग्रंथाची संदर्भ यादी जोडली आहे.

### विषय संकल्पना :

#### आर्थिक विकास :

स्थुल मानाने गत कालातील अर्थव्यवस्थांचा अभ्यास करणे म्हणजे आर्थिक इतिहास. आर्थिक इतिहासाचे क्षेत्र हे अर्थशास्त्राच्या क्षेत्राहुन काहिसे भिन्न आहे. अर्थशास्त्र हे समाजाच्या चालू आर्थिक प्रश्नांचा उहापोह करते. तर आर्थिक इतिहास गतकालीन घटनांचे परिशिलन करतो. वर्तमान आर्थिक समस्यांचे सम्यक आकलन व्हावे आणि आजच्या अनेक प्रश्नांचे मुळ इतिहासात नेमके कोठे दडलेले आहे याचे ज्ञान व्हावे हा या अभ्यासाचा हेतू आहे. अशा प्रकारच्या संशोधकास इतिहास लेखनाचे तंत्र जरी वापरावे लागत असले तरी समाजशास्त्रांच्या संशोधनपध्दतीचा उपयोगही अधिक प्रमाणावर करावा लागत आहे. प्रस्तुत विषयी आर्थिक इतिहासाशी संबंधित असला तरी आर्थिक विकासाचा इतिहास त्यात समाविष्ठ होणे आंतरशीय अभ्यासाच्या स्वरुपामुळे क्रमप्राप्त आहे.

### आजचा मराठवाडा

एक प्रदेश म्हणून मराठवाडा विभाग तसा लहान नाही. भारतातील १० राज्ये त्याच्याहुन लहान आहेत. १९८७ मध्ये जागतिक बँकेच्या अहवालानुसार जगातील १२८ देशापैकी ७१ देशाची लोकसंख्या मराठवाड्यापेक्षा कमी होती. असा महाराष्ट्र राज्यातील एक महत्वाचा प्रदेश अर्थिक विकासाव्या निकपांवर तौलनिक दृष्ट्या पिछाडीवर आहे.

मराठवाडा स्वातंत्र्यांनंतर महाराष्ट्र राज्याचा एक प्रादेशिक विभाग म्हणून समाविष्ठ झाल्यावर देश पातळीवरील तसेच राज्य पातळीवरील विकासासाठी अनेक प्रकारची धोरणे ठरविली गेली. आर्थिक नियोजन केले गेले. यात अनेक तज्ञ समित्या करार जसे १९५३ चा नागपुर करार, १९८४ सालची दांडेकर समिती, अभ्यास गट करार वैधानिक विकास मंडळ इ. चा समावेश आहे. याशिवाय वरील समित्या शायकीय धोरणे परिणाम कारक ठरली नाहीत म्हणुन १९९४ साली राज्य घटनेच्या कलम ३७१(२) अन्वये राज्यपाल यांच्या अधिकारात वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. वरील सर्वांची शासकीय पातळीवर अमंलबजावणी झाली किंवा नाही हा या प्रस्तुत संशोधनाचा मुख्य गाभा आहे.

### आर्थिक मागासलेपणाची कारण मिमांसा :

### अ) मराठवाड्याचे दरदोई कमी उत्पन्न

१९८९ ते १९९२ या ती वर्षात महाराष्ट्राचे सरासरी दरडोई उत्पन्न ७१०७ रु. तर मराठवाड्याचे सरासरी दरडोई उत्पन्न ४७३७ रु. हे इतर दोन प्रादेशिक विभागापेक्षा देखील कमीच होते. सन २०१२-२०१३ मध्ये मराठवाड्याचे चालु किमतीनुसार दरडोई जिल्हा उत्पन्न ६६५६१ रु. राज्याच्या १०३९९१ या उत्पन्नाच्या मानाने तसेच इतर प्रादेशिक विभागांपेक्षा देखील कमीच आहे. इतर महसुल विभागातील जिल्हा दरडोई उत्पन्न अनुक्रमे कोकण विभाग १५४०८०, नासिक ८०३४१, पुणे ११०७४२, अमरावती ६६८२६, नागपुर ८८२५३ असे आहेत. हे चित्र पुढील तक्याच्या आधारे अधिक स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३ प्रादेशिक दरडोई उत्पन्न २००४-२००५ च्या स्थिर किमतींनुसार**

| प्रदेश | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उर्वरित महाराष्ट्र | २३४५२ | २४७७१ | २६६५१ | २९४९३ | ३२७०४ | ३७४९९ | ४२८४६ | ५०४४७ | ६१७०८ | ६८८१८ |
| मराठवाडा | १५५९५ | १५४९१ | १६११८ | १७४०९ | १८४२९ | १९९३७ | २४०४८ | २७५५२ | ३३६८६ | ४०८२४ |
| विदर्भ | १९३२६ | १९१४० | २०९१३ | २२५५४ | २४६७३ | २५७४७ | ३०७११ | ३५१३४ | ४२०९३ | ५२२८२ |
| महाराष्ट्र राज्य | २२८०३ | २३०७२ | २४३७० | २६२२० | २९०१५ | ३२१७४ | ३६८८४ | ४२१५१ | ४९१५१ | ६०७०८ |

वरील आकडेवारीवरुन विषयक विवेचनावरून असे स्पष्ट होते की मराठवाडा विभागाचे दरडोई उत्पन्न वर्षानुवर्षे सातत्याने कमी आहे.

### ब) अर्थ व्यवस्थेत शेतीचे महत्व :

ग्रामीण भागातील ९० % लोक शेतीवर काम करतात. सरासरीने शेती उत्पादन जास्त असले तरी पावसाची शास्वती कमी तसेच ४०% हुन अधिक क्षेत्र दुष्काळप्रवण आहे. इतर पायाभुत सुविधांचा अभाव, शासकीय धोरणामध्ये सुसंगतपणा नसणे आणि अशा अनेक कारणास्तव शेतीतून अपेक्षित लाभ होत नाही.

### क) उद्योगधंदे फारच कमी :

१९९२ साली कारखान्यातुन काम करणाऱ्याचे दर एक लक्ष लोकसंख्येमागे प्रमाण केवळ ५६१ होते. आज २०१३-१४ मध्ये या विभागात सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम ११९५४ इतके असून ते राज्याच्या संख्येच्या केवळ ६.६ % आहे. रोजगाराची संख्या १.४९ लाख असून ती देखील राज्याच्या संख्येच्या ६.४ % आहे.

### १) सामाजिक मागासपणाची कारणे :

मराठवाड्यातील सामाजिक मागासपणाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. साक्षरता कमी विषेशतः स्त्रियांची साक्षरता फारच कमी.
२. शिक्षणाच्या सोई फारच कमी व त्याची गुणवत्ता फारच कमी.
३. तंत्र शिक्षणाच्या व व्यावसायिक कुशलता वाढविणाऱ्या सुविधा कमी.
४. आरोग्याच्या सोयी सुविधा कमी, कुपोषण अधिक राहणीमान निकृष्ठ.
५. मागासवर्गीयाचे प्रमाण अधिक शेत मजुरांचे प्रमाण अधिक
६. समाजात पुर्वीच्या सरंजामी रचनेचा प्रभाव अजुनही रेंगाळतो आहे.

७. सरकारी संस्था क्षीण.
८. स्वयंसेवी संस्थाचा अभाव
९. ग्रामपंचायती पासुन पुढच्या सर्व पातळयावरील राज्य प्रशासन क्षीण व उदासीन.

### शिक्षण :

मराठवाड्याचा शैक्षणिक मागासपणा ठळकपणे नजरेत भरण्यासारखा आहे. सर्व पातळ्यांवर प्रवेशाची नांव नोंदणी कमी आहे. गळती अधिक आहे. आणि नापासाचे प्रमाणही अधिक आहे. याला बऱ्याच अंशी गरिबी हे कारण आहे. पण शैक्षणिक सुविधांतील उणीवा शैक्षणिक प्रशासनाचा दुबळेपणा त्यामुळे खालावलेली गुणवत्ता हि महत्वाची कारणे आहेत. पुढील माहिती वरुन य बाबींची गंभीरता आपल्या लक्षात येते.

| मराठवाड्यातील साक्षरता | | राज्याच्या साक्षरतेपासुन अंतर | देशाच्या साक्षरतेपासून अंतर |
|---|---|---|---|
| | | सर्वसामान्य साक्षरता | |
| १९५१ | ९.०९ | ११.८७ | ७.५८ |
| १९६१ | १६.२९ | १३.५३ | ७.७१ |
| १९७१ | २५.८६ | १३.३२ | ३.६० |
| १९८१ | ३२.९ | १४.१२ | ४.०३ |
| | | सर्वसामान्य साक्षरता | |
| १९५१ | २.३० | ७.२१ | ५.६३ |
| १९६१ | ६.७५ | १०.०१ | ६.२५ |
| १९७१ | १२.५७ | १३.८६ | ६.१५ |
| १९८१ | १८.२१ | १४.४२ | ६.५९ |

सद्याची मराठवाड्याची साक्षरता ७६ आहे. स्त्रियांची साक्षरता आहे. ( २०१३-१४)

### पायाभुत सुविधा :

यात रस्ते, विज, पाण्याची उपलब्धता, तंत्रज्ञान यांचा समावेश होतो. पायाभुत सुविधांचा दर्जा, आर्थिक वाढीच्या तेसच या सुविधांचा वापर करणाऱ्या घटकांच्या कार्यक्षमतेवर थेट परिणाम करतो. या सुविधाद्वारे उपलब्ध होणाऱ्या सेवांमुळे भांडवलाच्या उत्पादकतेत वृध्दी होवून उत्पादन खर्च कमी होतो. नफा उत्पादन उत्पन्न व रोजगार यात वाढ होते. पायाभुत सुविधा पैकी सर्वात महत्वाची सुविधा म्हणजे रस्ते होत. या बाबत मराठवाड्या संबंधिचे चित्र पुढील आकडेवारीद्वारे स्पष्ट होते.

महाराष्ट्र राज्यात तौलनिक दृष्ट्या मराठवाड्यातील रस्त्याची एकुण किलोमीटर मध्ये लांबी तसेच रस्त्याद्वारे जोडलेल्या ग्रामीण भागातील लोकवस्त्यांची संख्या याचे प्रमाण कमी आहे. त्याचप्रमाणे मराठवाडा विभागात राष्ट्रीय महामार्ग ७९५किमी. , प्रमुख राज्य महामार्ग १७५७ कि.मी., राज्य महामार्ग ६३१६ कि.मी., प्रमुख जिल्हा रस्ते १३७७५ कि.मी., इतर जिल्हा रस्ते ७७७९ कि.मी., ग्रामीण रस्ते २२३७० कि.मी. हे प्रमाण इतर प्रादेशिक विभागाच्या तुलनेत कमी आहे.

**तक्ता क्र. ५ प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रस्त्याची लांबी व जोडलेल्या वस्त्या.**

| वैधानिक विकास महामंडळ | भौतिक लक्ष | | भौतिक साध्य | |
|---|---|---|---|---|
| | रस्त्यांची लांबी | लोकवस्त्यांची संख्या | रस्त्यांची लांबी | लोकवस्त्यांची संख्या |
| विदर्भ | ७७८२ | २९२१ | ७०८३ | २६६२ |
| मराठवाडा | ५०२७ | १८६३ | ४८८१ | १७५२ |
| उर्वरित महाराष्ट्र | १७७२२ | ३५२७ | १०४७७ | ३४५९ |
| महाराष्ट्र राज्य | २४५३१ | ८३११ | २२४४१ | ७८४३ |

### आरोग्य सुविधा :

सध्या महाराष्ट्र राज्यात चांगल्या प्रकारच्या आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत राज्यातील ३६ जिल्ह्यापैकी १ ते ३ क्रमांक रत्नागिरी, सांगली व रायगड या जिल्ह्याचा समावेश आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांची क्रमवारी ३३ मध्ये पुढील प्रमाणे आहे.

| जिल्हा | आरोग्य सुविधा याबाबत क्रम | जिल्हा | आरोग्य सुविधा याबाबत क्रम |
|---|---|---|---|
| लातुर | ११ | औरंगाबाद | १९ |
| नांदेड | १६ | जालना | २० |

| | | | |
|---|---|---|---|
| उस्मानाबाद | १७ | परभणी | २२ |
| बीड | १८ | हिंगोली | २६ |

आंतरराष्ट्रीय लोकसंख्या संशोधन संस्था देवनार यांनी केलेल्या जिल्हा स्तरीय आरोग्य सर्वेक्षणानुसार ० ते ५ वयोगटातील मृत्यूदर महाराष्ट्र राज्यात विदर्भ ५३, मराठवाडा ४६, उर्वरित महारष्ट्र ३४ तर संपुर्ण राज्यात हे प्रमाण ४० इतके होते यावरून राज्याच्या त्याचबरोबर मराठवाड्याच्या आरोग्य विषयक स्थितीची आपणास कल्पना येते.

**प्रशासकीय बदल :**

काही प्रतिकुल बाबी म्हणून उल्लेख : आर्थिक उदारीकरणाचा भाग म्हणून नियोजनाच्य पध्दतीत आमुलाग्र बदल झाला आहे. निरनिराळ्या प्रकल्पांचा व योजनांचा पंचवार्षिक योजनांमध्ये समावेश करून त्यासाठी साधनसंपदा वेगळी काढून दाखविण्याची पध्दत आजवर होती. नियोजनाप्रमाणे साधनसंपदेची जुळवाजुळव करण्यावर केंद्र व राज्य सरकारचा भर असे हि धनसंपदा राखुन ठेवण्याची allocative पध्दत बदलुन त्यास जागी फांस सारखी indicative पध्दत आल्याने नियोजन प्रकियेस संकोच होतो.

**अनुमान व निष्कर्ष :**

मराठवाडा हा प्रदेश महाराष्ट्र राज्याच्या एकुण क्षेत्रफळापैकी २० पेक्षा जास्त क्षेत्र व्यापणारा प्रदेश आहे. मराठवाड्याला राज्यात ऐतिहासिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, पर्यटनविषयक राजकीय महत्व आले आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासुन मराठवाड्यासाठीचे आर्थिक नियोजन व अंमलबजावणी यात दरी किंवा तफावत दिसुन येते. कारण गेल्या ६० ते ७० वर्षात अनेक प्रकारच्या योजना वैधानिक विकास मंडळासारख्या स्टॅटयुटरी संस्थाचा अंतर्भाव असून देखिल मराठवाड्याच्या अर्थिक विकासाचा अनुपेश कायम दिसून येत आहे. त्यासाठी केंद्रानुगामी योजनांचा पुनर्विचार करून प्रादेशिक पातळीवरील समस्यांचा साकल्याने विचार नियोजन तसेच अमंलबजावणी कण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ सुची :**


१. गोगटे श्री. ब. मराठवाड्यातील शिक्षण : एक विवेचक अभ्यास, पुणे कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९८६
२. गोगटे श्री. ब. मराठवाड्यातील सुची : औरंगाबाद : पदमालय प्रकाशन, २००१ पृ.४.
३. Damle, Jasmine. Beyound economic development, New Delhi. A Mittal Publication, २००१. Pp १७३
४. देगलुकर, गो. व. मराठवाडा. सामाविष्ट : मराठी विश्वकोष खंड १२ , मुंबई : मराठी विश्वकोश मडळ, १९७६ पृ. ११७३
५. धोंगडे, ए.रा. आर्थिक इतिहास सामाविष्ट मराठी विश्वकोष खंड २, मुंबई : मराठी विश्वकोश मडळ, १९७६ प. २०३
६. कुलकर्णी, भुजंगराव, मराठवाड्याचा विकास : अभ्यास व चिंतन, औरंगाबाद, श्रेयस प्रकाशन १९९८ पृष्टे ३२८
7. Kurulkar, R.P. Problem of regional disparities in Maharashtra : State and role of regional development boards. Journal of Indian School of Political Economy , 21(1-4) Jan-Des. 2009. P. 261-280
८. भांडवलकर, रामदास, महाराष्ट्रातील आंतर प्रादेशिक विषमता अर्थसंवाद ३९(१) एप्रिल -जुन २०१५ पृ. ४४-५२
९. महाराष्ट्र, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २०१३-१४. मुंबई, २०१४, पृष्ठे २३७
१०. महाराष्ट्र वित्त व नियोजन विभाग, प्रादेशिक असमतोल सत्य शोधन समिती अहवाल, मुंबई १९८४. पृ. ३५२
11. Maharashtra Planning Department, High Level Committee on balanced Regional Development issues in Maharastra, Report, Mumbai Pp. 571